# महा न्युज 96

MAHA NEWS 96

संपादक-संदिप बाबळे

मो-9595950289

Friday 25th April 2026 | वर्ष - 1 | अंक ०1 | पृष्ठ ०१

https://mahanews96.in


## संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या इंदापूर येथील दौऱ्यादरम्यान सकल मराठा समाजाच्या समितीच्या वतीने त्यांची भेट




**सातारा गॅझेट लवकरात लवकर मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी, तसेच मराठा समाजातील कुणबी दाखल्यांबाबत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर*कराव्यात,अशी मागणी करण्यात आली**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या इंदापूर येथील दौऱ्यादरम्यान सकल मराठा समाजाच्या समितीच्या वतीने त्यांची भेट घेण्यात आली. यावेळी विविध महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनामध्ये सातारा गॅझेट लवकरात लवकर मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी, तसेच मराठा समाजातील कुणबी दाखल्यांबाबत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर*कराव्यात,अशी मागणी करण्यात आली.गरजू व सामान्य कुटुंबांतील मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लवकरात लवकर कुणबी दाखले मिळावेत, यावरही भर देण्यात आला. तसेच, आजपर्यंत देण्यात आलेल्या कुणबी दाखल्यांची संपूर्ण नोंद ऑनलाइन प्रणालीमध्ये उपलब्ध करून द्यावी, अशी महत्त्वाची मागणीही करण्यात आली.

यावेळी श्री अरुण काकडे, डॉ. विकास देशमुख,श्री विलास सोमदे, श्री तुषार बागल, श्री धर्मनाथ लावंड, फलटण येथील श्री माऊली दादा सावंत,श्री विक्रम शितोळे,श्री राम सपकाळ,अक्षय तावरे,मंच्छिद्र भोसले,नरेश सकतेओमकार शिंदे,अनुराग तावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी सर्व मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक व योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले असून, पुढील भूमिका लवकरच जाहीर करण्यात येईल, असे सांगितले.... श्री अरुण काकडे मराठा सेवक समन्वयक 🚩🚩 एक मराठा लाख मराठा 🚩🚩🚩

**Top News**

# कल्याणमध्ये 4 मे रोजी राडा होणार? मराठी सक्तीच्या मुद्यावर मनसेचा आक्रमक इशारा

Kalyan News: कल्याणमध्ये मराठी भाषेच्या सक्तीवरून राजकारण चांगलेच तापले असून मनसे आणि काही संघटना समोरासमोर ठाकण्याची शक्यता आहे.

Kalyan News: कल्याणमध्ये मराठी भाषेच्या सक्तीवरून राजकारण चांगलेच तापले असून मनसे आणि काही संघटना समोरासमोर ठाकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. 4 मे रोजी मराठी सक्तीच्या विरोधात पुकारण्यात आलेल्या आंदोलनाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मनसे स्टाईलने उत्तर देण्याचा इशारा दिला आहे. यामुळे येत्या काळात कल्याणमधील वातावरण अधिक तणावपूर्ण होण्याची चिन्हे आहेत.

मराठीच्या मुद्द्यावरून मनसे आक्रमक

कल्याणमध्ये मराठी सक्तीच्या मुद्द्यावरून मनसेने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. काही संघटनांनी मराठी सक्तीच्या विरोधात आंदोलनाची हाक दिली असली तरी, मनसेने याला चोख प्रत्युत्तर देण्याचे ठरवले आहे. मराठी रिक्षा चालकांना कोणी त्रास दिला किंवा मराठी भाषेचा विरोध केला, तर त्यांना मनसे स्टाईलने धडा शिकवला जाईल, असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या संदर्भात मनसेच्या वतीने कल्याणच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदनही देण्यात आले आहे.

मराठी रिक्षा चालकांना पाठिंबा देण्यासाठी मनसेने एक नवीन पाऊल उचलले आहे. मराठी चालकांच्या रिक्षांवर विशेष स्टिकर्स लावण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या माध्यमातून मराठी भाषेचा प्रसार आणि चालकांचे समर्थन केले जाणार आहे. मनसे पदाधिकारी योगेश पाटील यांनी या मोहिमेबाबत माहिती दिली असून, मराठी भाषेचा सन्मान राखण्यासाठी मनसे कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

आरटीओ प्रशासनाकडे ठोस मागण्यांचे निवेदन

माजी आमदार राजू पाटील यांच्या नेतृत्वाखालील मनसेच्या शिष्टमंडळाने कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयात (RTO) जाऊन प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर केले. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार सार्वजनिक सेवा क्षेत्रात मराठीचा वापर अनिवार्य आहे. मात्र, अनेक रिक्षा आणि टॅक्सी चालक या नियमांचे उल्लंघन करत असल्याचे मनसेचे म्हणणे आहे.



मनसेच्या शिष्टमंडळाने कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयात (RTO) जाऊन प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर केले.

## भीमा पाटसच्या प्रशासक नियुक्तीला सहकार मंत्र्यांची स्थगिती, संचालक मंडळ जैसे थे – संचालक तुकाराम ताकवणे यांची माहिती



**सहकार विभागात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली असून, प्रादेशिक सहसंचालक (साखर) नीलिमा गायकवाड यांनी दिलेल्या आदेशाला थेट सहकार मंत्र्यांनी स्थगिती दिली आहे**

दौंड : सहकार विभागात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली असून, प्रादेशिक सहसंचालक (साखर) नीलिमा गायकवाड यांनी दिलेल्या आदेशाला थेट सहकार मंत्र्यांनी स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत पारित करण्यात आलेल्या या आदेशाविरोधात भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुकाराम भिकोबा ताकवणे यांनी मंत्रालयात धाव घेतली होती. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तातडीने आदेशाला स्थगिती दिल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे विभागाच्या प्रादेशिक संयुक्त संचालक (साखर) यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी संबंधित प्रकरणावर आदेश दिला होता. या आदेशामुळे भीमा सहकारी साखर कारखाना, पाटस येथील प्रशासकीय कामकाजात मोठे बदल अपेक्षित होते. मात्र, हा निर्णय एकतर्फी असून नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप संचालक तुकाराम ताकवणे (रा. पारगाव) यांनी केला आहे.

याविरोधात त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम १५२ व १५४ अंतर्गत ‘रिव्हिजन अप्लिकेशन’ (पुनर्विचार अर्ज) दाखल करत थेट मंत्रालयाचे दार ठोठावले. या प्रकरणात प्रादेशिक संयुक्त संचालक यांच्यासह नियुक्त प्रशासकीय समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

सहसंचालकांनी आदेश देताना नैसर्गिक न्यायदानाचा भंग केला का, तसेच नियुक्त समितीच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता होती का, असे महत्त्वाचे प्रश्न अर्जाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आले आहेत. सहकार क्षेत्रातील राजकीय आणि प्रशासकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, मंत्र्यांनी दिलेल्या स्थगितीनंतर या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुणे जिल्हा पडवी रामोशी वस्ती गायकवाड मळा, पाणीटंचाई ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी

**TOP NEWS |**

दौंड , तालुका पडवी ग्रामपंचायत पाणीपुरवठा विहिरीच्या पाण्याची पातळी खोलवर गेलेली आहे रामोशी वस्ती गायकवाड मळावा चिकुटमळा नाना मळा पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे ग्रामपंचायत कार्यालय यांच्याकडून टँकर मागणीसाठी प्रस्ताव पंचायत समिती दौंड यांच्याकडे सादर करण्यात आला असून गटविकास अधिकारी व पाणीपुरवठा अधिकारी यांनी या प्रस्तावाची दखल घेतलेली नसून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भर उन्हाळ्यामध्ये विहिरी वरती पाण्यासाठी भटकत राहावे लागत आहे

महिला व जेष्ठ नागरिक व अपंग यांना पिण्याच्या पाण्यापासून अतिशय त्रिव्रता पाणी टंचाई निर्माण झाली असून व शाळेतील लहान मुले उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा हंडा डोक्यावरती घेऊन पाण्यासाठी वन वन भटकत आहेत व रामोशी वस्ती येथील ग्रामस्थांनी दोन दिवसांमध्ये पाणीपुरवठा व टँकर पंचायत समिती यांच्याकडून न मिळाल्यास ग्रामपंचायत कार्यालय वरती हंडा मोर्चा नेण्यात येईल व अन्यथा पंचायत समिती दौंड हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे शासनाने याची लवकरात लवकर दखल घेऊन टँकर सुरू करावा व गाई म्हैस व दूध व्यवसाय या पाणीटंचाईमुळे लोकांचे आर्थिक जीवन धोक्यात आलेले आहे ग्रामस्थांची मागणी आहे

**दौंड हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे**



**पंचायत समिती दौंड यांच्याकडे सादर करण्यात आला असून गटविकास अधिकारी व पाणीपुरवठा अधिकारी यांनी या प्रस्तावाची दखल घेतलेली नसून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भर उन्हाळ्यामध्ये विहिरी वरती पाण्यासाठी भटकत राहावे लागत आहे**

# ठाण्यातील मुंब्रा परिसरातील खाडी किनाऱ्यावर एका व्यावसायिकाकडून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असा प्रकार सुरू

|

ठाण्यातील मुंब्रा परिसरातील खाडी किनाऱ्यावर एका व्यावसायिकाकडून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असा प्रकार सुरू असल्याचे समोर आले. अनधिकृतपणे तेथील मौल्यवान कांदळवन नष्ट करून संबंधित जागेवर भरणी करण्यात येत होती आणि त्या जागेवर बेकायदेशीररित्या मालकी हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात होता.

कांदळवन हे किनारपट्टीच्या पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली. या संपूर्ण घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस नताशा आव्हाड आणि नगरसेविका मनीषा भगत यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेले सर्व बेकायदेशीर प्रकार त्वरित ताकीद संबंधितांना दिली. तसेच पर्यावरणाची हानी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी,अशी आग्रही आणि स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. यावेळी मुंब्रा परिसरातील स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिसरातील नैसर्गिक संपत्ती आणि जनतेच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त

**पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली.**



**कांदळवन हे किनारपट्टीच्या संरक्षणासाठी तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली**

🌴🏡 20 लाखात 1 गुंठा NA plot जागेसहीत तयार 1bhk घर 🏡 🌴 यवत रेल्वे स्टेशन लगत प्रशस्त लोकवस्ती मध्ये 🏡🌴

FOR SALE





आम्ही देत असलेल्या उपलब्ध सोयी सुविधा पुढीलप्रमाणे
▪ सिमेंट कॉंक्रिट रोड
▪ अंडर ग्राउंड इलेक्ट्रिसिटी
▪ अंतर्गत ड्रेनेज लाईन
▪ 24 तास पाण्याची सुविधा
▪ रेल्वे स्टेशन 0 मिनिट अंतरावर
▪ पुणे-सोलापूर हायवे 2 मिनिट अंतरावर
आणि इतर बऱ्याच सुविधांसह "घरमालकीचा तुमचा प्रवास आमच्यापासून सुरू होतो."तर

आजच आपले घर बुक करा.
📞संपर्क क्रमांक -

Contact for possesion
*9091 99 2244

## पाटस येथे वृक्षारोपणाचा उत्तम परिणाम; एका झाडाखाली वाहनांना मिळाला आसरा....



**वृक्ष हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. ते आपल्याला शुद्ध हवा, थंडावा, फळे, औषधे आणि पर्यावरणाचा समतोल देतात**

पाटस येथे शिव शंभूराजे प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आलेल्या वृक्षारोपण उपक्रमाचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत आहेत. काही दिवसांपूर्वी लावलेले हे झाड आज मोठे होऊन परिसरात थंड सावली निर्माण करत आहे.

कडक उन्हामुळे त्रस्त झालेल्या वाहनचालकांनी या झाडाखाली आपल्या दुचाकी व चारचाकी वाहने उभी करून दिलासा मिळवला. एका झाडाखाली अनेक गाड्यांनी घेतलेला आसरा हे वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करणारे जिवंत उदाहरण ठरत आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण किती आवश्यक आहे, याची जाणीव या घटनेतून स्पष्ट होत असून, नागरिकांनीही अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

वृक्ष हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. ते आपल्याला शुद्ध हवा, थंडावा, फळे, औषधे आणि पर्यावरणाचा समतोल देतात. आजच्या वेगवान शहरीकरणामुळे झाडांची संख्या झपाट्याने कमी होत आहे, त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. अशा परिस्थितीत वृक्षारोपण ही केवळ एक कृती नसून आपली सामाजिक आणि नैतिक जबाबदारी बनली आहे.

वृक्षारोपणामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड कमी होऊन ऑक्सिजनची पातळी वाढते. झाडे पावसाचे प्रमाण संतुलित ठेवण्यास मदत करतात तसेच मातीची धूप रोखतात. उन्हाळ्यात झाडांची सावली ही नैसर्गिक थंडावा देणारी ठरते, जी माणसांसोबतच प्राणी-पक्ष्यांसाठीही अत्यंत उपयुक्त आहे.

आज अनेक सामाजिक संस्था, शाळा आणि नागरिक मिळून वृक्षारोपणाचे उपक्रम राबवत आहेत. मात्र, केवळ झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात किमान एक तरी झाड लावून त्याची काळजी घेतली, तर पर्यावरण संवर्धनाचा मोठा पाया तयार होऊ शकतो.

“एक झाड लावा, जीवन वाचवा” हा संदेश प्रत्येकाने मनात ठेवून वृक्षारोपणात सहभागी होणे ही काळाची गरज आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार आणि निरोगी वातावरण निर्माण करणे हे आपले कर्तव्य आहे. 🌱🌍

## चला.. चला... बाजाराला चला...!!!



**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शहरातील पारंपारिक आठवडी बाजार बंद करण्याचा निर्णय घेतला आहे**

आठवडी बाजार बंद करण्याच्या विरोधात शिवसेनेचे भव्य जनआंदोलन

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शहरातील पारंपारिक आठवडी बाजार बंद करण्याचा निर्णय घेतला आहे..

शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन करत निषेध व्यक्त केला.. बिल्डरांच्या घशात आठवडी बाजार हा बंद करून घातला जाणार असल्याचा आमचा स्पष्ट आरोप भाजपावर आहे.. यावेळी माझ्यासह उपनेते सुभाष पाटील, बाळासाहेब थोरात आदींची उपस्थिती होती.




## केवळ गुंडांच्या जोरावर कर्जाची वसुली करू शकत नाहीत

|

संतापजनक!

हडपसर, पुणे येथे एका व्यक्तीला भररस्त्यात बँकेचे वसूली एजंट घेरुन मारहाण करतात. रिझर्व्ह बँकेने स्पष्टपणे नमूद केले आहे की -


१. वसुली एजंट कुर्जदाराला केवळ सकाळी ७:०० ते संध्याकाळी ७:०० या वेळेतच फोन करू शकतात किंवा भेटू शकतात.

२. एजंटांनी कोणत्याही परिस्थितीत शारीरिक किंवा मानसिक छळ, अपमान किंवा मारहाण करणे हा गंभीर गुन्हा आहे.

कर्जदाराच्या थकबाकीची माहिती त्याच्या शेजाऱ्यांना किंवा मित्रांना देऊन त्याची बदनामी करता येत नाही.

वसुलीसाठी येणाऱ्या व्यक्तीकडे बँकेने दिलेले अधिकृत ओळखपत्र आणि अधिकृत पत्र असणे अनिवार्य आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने देखील स्पष्ट केले आहे की, बँका केवळ गुंडांच्या जोरावर कर्जाची वसुली करू शकत नाहीत.जर बँकेच्या एजंटने कायद्याचे उल्लंघन केले, तर त्यासाठी संबंधित बँकेला जबाबदार धरले जाईल.

या सगळ्या गोष्टी धाब्यावर बसवून हडपसरमध्ये ही मारहाण झाली.राज्यात कायदा सुव्यवस्था अस्तित्वात आहे की नाही, याबाबत शंका यावी अशी ही घटना आहे. राज्याच्या गृहखात्याने या घटनेची गांभीर्याने नोंद घ्यावी. सदर वसुली एजंटावर कारवाई झाली पाहिजेच पण संबंधित बँकेचीही जबाबदारी टाळता येणार नाही. या बँकेवरही योग्य ती कारवाई झाली पाहिजे. या खासगी फायनान्स कंपन्यांच्या मुजोरीला आळा घालणे गरजेचे आहे.



कर्जदाराच्या थकबाकीची माहिती त्याच्या शेजाऱ्यांना किंवा मित्रांना देऊन त्याची बदनामी करता येत नाही